## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. १५ (      ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या क्रीडा संकुलात सुरु असलेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ टेबल टेनिस (महिला) स्पर्धेचा तिसऱ्या दिवशी दुपार पर्यंत झालेल्या उपउपांत्य सामन्यांमध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे, वीर नर्मद दक्षिण गुजरात विद्यापीठ, सुरत, देवी अहिल्याबाई विद्यापीठ, इंदोर आणि मुंबई विद्यापीठ, मुंबई  यांनी आपल्या प्रतिस्पर्ध्यांवर मात करीत उपांत्य फेरीत प्रवेश केला.

गुरुवारी झालेले सामने चुरशीचे झाले. गतवर्षी गुणानुक्रमे वरचढ ठरलेल्या चार संघांना या वर्षी थेट उपउपांत्य फेरीसाठी पात्र ठरविण्यात आले होते. त्यामध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे, राजस्थान विद्यापीठ, जयपूर, देवी अहिल्याबाई विद्यापीठ, इंदोर आणि मुंबई विद्यापीठ, मुंबई या चार संघांचा समावेश होता. यामध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा सामना गुजरात तंत्रज्ञान विद्यापीठ, अहमदाबाद यांच्याशी झाला. त्यामध्ये पुणे विद्यापीठाने ३-२ ने विजय प्राप्त केला.  राजस्थान विद्यापीठ, जयपूरची लढत वीर नर्मद दक्षिण गुजरात विद्यापीठ, सुरत यांच्यासमवेत झाली. यामध्ये वीर नर्मद विद्यापीठाने ३-१ ने विजय प्राप्त केला. देवी अहिल्याबाई विद्यापीठ, इंदोरने एल.एन.आय.पी.ई. विद्यापीठ, ग्वाल्हेरवर चुरशीच्या लढतीत ३-२ ने विजय प्राप्त केला. तर चौथ्या झालेल्या सामन्यात मुंबई विद्यापीठाने शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरवर ३-० असा एकतर्फी विजय प्राप्त केला. सायंकाळी उपांत्य फेरीतील सामन्यांना प्रारंभ झाला होता.

विद्यापीठात सुरु असलेल्या या सामन्यांचा आनंद कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील, प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर, व्यवस्थापन परिषद सदस्य दिलीप पाटील, कुलसचिव भ.भा.पाटील यांनी घेतला. या सर्वांनी खेळाडू आणि प्रशिक्षक यांच्याशीही संवाद साधला. या स्पर्धेसाठी विवेक अळवणी, रोहित शिंदे, विराज नेरुरकर, आनंद शर्मा, पुजारी गुप्ता, आकाश पवार, अजिंक्य सुर्यवंशी, अमित चौधरी, अनिकेत अळवणी, श्रीधर त्रिपाठी, प्रविण ठाकरे यांनी रेफ्री व पंच म्हणून काम पाहिले.

उद्या शुक्रवारी सायंकाळी ४ वाजता या स्पर्धेचा समारोप होणार असून वैद्यकीय शिक्षण व जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांच्याहस्ते पारितोषिक वितरण होणार आहे. यावेळी आमदार स्मिताताई वाघ, आमदार सतीश पाटील, आमदार उन्मेश पाटील तसेच प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर, व्यवस्थापन परिषद सदस्य दिलीप पाटील उपस्थित राहणार आहेत. कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील अध्यक्षस्थानी राहतील.

---

जा.क्र. : कबचौउमवि/16/हस्तदेय /2018 — दिनांक : 15 नोव्हेंबर, 2018

प्रति,
**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून  प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी